# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पंडीत दीनदयाल उपाध्याय एकात्म मानववाद अध्यासन केंद्र

एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव कार्यक्रम

(२५ सप्टेंबर, २०२५ ते २२ एप्रिल, २०२५)

आ.जा./क्र./८०५/२०२५

दि. ३०/०९/२०२५

**प्रती,**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :— एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सवाच्या अनुषंगाने महाविद्याालय व पदव्युत्तर शैक्षणिक विभागात आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांबाबत.**

संदर्भ :— १) समन्वयक नेमणूक व समन्वयकांनी कार्यशाळेला उपस्थित राहण्याबाबत चे पत्र क्र. ३३२/२०२५ दि. ०९/०९/२०२५
२) संदर्भ क्र. १ चे स्मरण पत्र दि. २०/०९/२०२५
३) दि. २३/०९/२०२५ रोजी झालेली कार्यशाळा

**महोदय,**

वर उल्लेखीत संदर्भांकीत विषयान्वये आपलया महाविद्यालयात एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव कार्यक्रमाअंतर्गत आपण नेमलेल्या समन्वयकाने पुढील प्रमाणे कार्यक्रांचे आयोजन करणे अपेक्षीत आहे.

**रील्स स्पर्धा आणि निबंध स्पर्धा**
**विषय :—**

१) एकात्म मानवदर्शन — समग्र विकासाचा मार्ग (Ekatma Manav Darshan A path to holistic development)

२) पंडीत दीनदयाल उपाध्याय — एक दुरदर्शी नेता (Pandit Deendayal Upadhyay : A Visionary Leader)

३) एकात्म मानवदर्शनाचे क्रियांन्वयन (Ekatma Manv Darshan in Action)

४) एकात्म मानववादर्शनाची शक्ती (The power of Ekatma Manav Darshan)

५) एकात्म मानवदर्शनाच्या माध्यमाने युवकांचे सशक्तीकरण (Empowering youth through Ekatma Manav Darshan)

६) पंडीत दीनदयाल उपाध्याय यांच्या विचार धारेचा प्रभाव (The impact of Pandit Deendayal Upadhyay's ideology)

७) आधुनिक काळात एकात्म मानव दर्शनाची प्रासंगीकता (Relevance of Ekatma Manav Darshan in modern times)

८) भारताच्या भविष्याकरिता पंडीत दीनदयाल उपाध्याय यांचा दृष्टीकोण (Pandit Deendayal Upadhyay's vision for india's future)

रिल्स – वरील पैकी कोणत्याही एका विषयावर विद्यार्थी जास्तीत – जास्त ६० सेकंडची रिल तयार करतील. एका महाविद्यालयातून एक रिल dsd.gug123@gmail.com या ई–मेल वर पाठविण्यात यावी. महाविद्यलयाने पाठविलेल्या फक्त प्रथम रिलचाच विचार केला जाईल व इतर रिल खारीज केले जातील कृपया याची नोंद घ्यावी.

**निबंध स्पर्धा** :– रिल्स स्पर्धा आणि निबंध स्पर्धेचे विषय सारखे असून नमूद विषयापैकी एका विषयावर विद्यार्थ्यांनी निबंध लिहायचा आहे. महाविद्यालयानी निवडलेला एक निबंध पी. डी. एफ (PDF) फॉरमेट मध्ये dsd.gug123@gmail.com या ई–मेल वर पाठविण्यात यावा. महाविद्यालयाने पाठविलेल्या फक्त प्रथम निबंधाचाच विचार केला जाईल व इतर निबंध खारीज केले जातील. कृपया याची नोंद घ्यावी. निबंधाकरिता शब्द मर्यादा अधिकतम १५०० शब्दांची असेल.

**पुस्तक परीक्षण** :–

खालील पैकी एका पुस्तकाचे परीक्षण करण्यात येईल :–

१) एकात्म मानववाद

२) राष्ट्र जीवन की दिशा

३) दीनदयाल उपाध्याय व्यक्ती और विचार

४) राष्ट्र चिंतन

५) चंद्रगुप्त मौर्य

६) शंकराचार्य की जीवनी

वरील पुस्तक https://deendayalupadhyaya.org/books/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. एका पुस्तकाचे परीक्षण विद्यार्थीला करावयाचे आहे. परीक्षणाचे मुद्दे ठरविण्याचे स्वातंत्र्य महाविद्यालयांना राहील. पुस्तक परिक्षणाची अधिकतम शब्द मर्यादा ७०० शब्दांची राहील. महाविद्यालयानी निवडलेल्या एका पुस्तकाचे परीक्षण (PDF) फॉरमेट मध्ये dsd.gug123@gmail.com या ई–मेल वर पाठविण्यात यावा. महाविद्यालयाने पाठविलेल्या फक्त प्रथम पुस्तक परीक्षणाचा विचार केला जाईल व इतर पुस्तक परीक्षण खारीज केले जातील, कृपया याची नोंद घ्यावी.

**सुचना** :– प्रत्येक महाविद्यालयाने फक्त एकच रिल, निबंध आणि पुस्तक परीक्षण पाठविणे बंधन कारक आहे. प्रत्येक महाविद्यालयातून एक रिल, निबंध व पुस्तक परीक्षण पाठविले जाऊ शकते एका महाविद्यालयातून एका पेक्षा जास्त प्राप्त रिल, निबंध किंवा पुस्तक परीक्षण खारीज केले जातील. एका

महाविद्यालयातून प्रथम प्राप्त रील, निबंध व पुस्तक परिक्षणच ग्राहय धरले जाईल व नंतरचे सर्व रिल, निबंध आणि पुस्तक परीक्षण खारीज केले जातील याची कृपया नोंद घ्यावी. बक्षीस व प्रमाणपत्र वितरणाची सूचना यथायोग्य कळविली जाईल. आपल्या महाविद्यालयातील एक रिल, निबंध आणि पुस्तक परिक्षण आपल्या महाविद्यालयातील हिरक महोत्सवी कार्यक्रम समन्वयकाने महाविद्यालयाच्या ई—मेल वरून पाठविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या ई—मेल वरून पाठविलेल्या प्रविष्टया रद्द केल्या जातील. प्रविष्टया dsd.gug123@gmail.com फक्त याच ई—मेल वर पाठविण्यात याव्या. इतर ई—मेल वर पाठविण्यात येणाऱ्या प्रविष्टया ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. रिल्स, निबंध आणि पुस्तक परीक्षण ई—मेल च्या माध्यमाने सादर करण्याची अंतीम तिथी पुढील प्रमाणे आहे.

| कार्यक्रम | अंतिम तिथी |
|---|---|
| रिल्स | बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ |
| निबंध स्पर्धा | शनिवार, ३१ जानेवारी २०२६ |
| पुस्तक परिक्षण | शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ |

30/9/25

डॉ. अनिरूध्द गचके
समन्वयक
पंडीत दीनदयाल उपाध्याय
एकात्म मानववाद अध्यासन केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

डॉ. प्रिया गेडाम
संचालक
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

डॉ. श्रीराम कावळे
प्र—कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली